103


## महाराष्ट्र शासन
### मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक यांचे कार्यालय.
जुना आग्रा रोड, अरण्य संकुल, आदिवासी विकास भवन समोर, नाशिक ४२२ ००२.
दूरध्वनी क्र.०२५३-२५९८५४५. ई-मेल- ccfnashik२०१२@gmail.com


जा.क्र. :कक्ष-2/जमिन/प्र.क्र.08/2021-22/ 1321 /सन 2022-23 दिनांक :- 10 /03/2023

**ई-मेलव्दारे/ पत्र**

**प्रति,**

**मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य, नागपुर**

**विषय :-** **वनजमीन- नाशिक**
**बोरीपाडा-लघुसिंचन तलावासाठी ९.१९ हे. वनजमीन वळती करणेबाबत**

**संदर्भ :-** 1)शासन महसुल व वनविभाग पत्र क्रमांक एफएलडी-1521/प्र.क्र.233/फ-10, दिनांक 19/04/2022
2) आपले कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-17/नोडल/नाशिक/आयडी-12924/229/22-23, दिनांक 11/05/2022
3) जिल्हा जल संधारण अधिकारी, मृद धारण विभाग, नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र. जिजसंअ/वि/ना/प्रशा/3723, दिनांक 01/12/2022
4) उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-3/जमीन/ कॅम्पा/ 1868, दिनांक 24/02/2023

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद संधारण विभाग नाशिक यांचे कडील लघु पाटबंधारे तलाव बोरीपाडा करीता वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत 9.19 हेक्टर वनजमीन वळतीकरण प्रस्ताव शासनास सादर करण्यांत आलेला होता. सदरहु प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावासाठी वळती होणारे 9.19 हेक्टरच्या बदल्यात पर्यायी वनीकरणासाठी मौज होलदारनगर ता. त्र्यंबक जि. नाशिक येथील गट नं.13 मधील एकुण 31.97 हे. पैकी 9.19 हेक्टर क्षेत्रावर पर्यायी वनीकरणाचे काम प्रस्तावित करण्यांत आलेले होते.

तथापि संदर्भिय शासन पत्र क्रमांक 1 अन्वये बोरीपाडा प्रस्तावाकरीता प्रस्तावीत करण्यांत आलेले क्षेत्र हे पर्यायी वनीकरणासाठी सुयोग्य नसुन प्रकल्प यंत्रणेने पर्यायी वनीकरणासाठी अन्य ठिकाण प्रस्तावित करावे अथवा प्रकल्प यंत्रणेकडुन दुप्पट अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण करण्यासाठी आवश्यक रक्कम भरण्याबाबतचे हमीपत्र घेण्यांत यावे तसेच पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या जमीनीचा तपशिल, kml file, गा.न.नं.7/12, नकाशे, 10 वर्षाची पर्यायी वनीकरण योजना, प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र इ.आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार प्रकल्प यंत्रणेने त्यांचे कडील पत्र क्र. जिजसंअ/वि/ना/प्रशा/412 दिनांक 21/02/2022 अन्वये दुप्पट अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरणासाठी आवश्यक असणारी रक्कम देण्याबाबत हमीपत्र व त्रुटींची पुर्तता करुन संदर्भिय पत्र क्रमांक 3 अन्वये अहवाल सादर केलेला आहे. त्यानुसार उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक संदर्भिय पत्र क्रमांक 4 अन्वये या कार्यालयास खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

केंद्र शासनाचे वन (संवर्धन) अधिनियम,1980 अंतर्गत सन 2019 मध्ये प्रसारीत करण्यांत आलेले **Hand Book** प्रकरण क्र.2 पर्यायी वनीकरण बाबतचे मुददा क्र. 6 मधील तरतुदी नुसार वनेत्तर क्षेत्रासाठी पर्यायी वनीकरण योजना ही 1000 रोपांची तयार करण्यांत यावी जर का सदरहु वनेत्तर क्षेत्रावर 1000 रोपे प्रति हेक्टर लावणे शक्य नसल्यास उर्वरीत रोपांची लागवड अवनत वनक्षेत्रावर करण्यांत यावी असे नमुद केलेले आहे. तसेच केंद्र शासनाचे दिनांक 29.06.2022 चे अधिसुचनेतील परिच्छेद क्र.11 मध्ये नमुद केले आहे की, In case the Non-Forest Land or Portion thereof provided by the User agency is not fit for raising Compensatory Afforestation of a specified density,then additional Compensatory Afforestation shall be raised on a degraded notified or unclassed forest land under the management control of the Forest Department which is twice in size of such shortfall in the given Compensatory Afforestation land and user agency shall also bear the additional cost on

102

such account. हि बाब लक्षात घेवुन पर्यायी वनीकरणासाठी पश्चिम भाग नाशिक वनविभागातील खालील नमुद तपशिलाप्रमाणे 18.38 हेक्टर अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरणाची कामे प्रस्तावित करण्यांत आलेली आहे.

| अ. नं. | वनक्षेत्राचे नांव | गावाचे नांव | सर्व्हे नंबर | गट नंबर | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित क्षेत्र हे. | आवश्यक रक्कम | वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पेठ | विळवंडी | 247 | 477, 476,499 | 10.00 | 10682916 | राखीव वन |
| 2 | | | | 526, 527, 528, 529 | 8.38 | 8606282 | राखीव वन |
| एकुण वळतीकरण क्षेत्र 9.19x2=18.38 | | | | **एकुण** | **18.38** | **19289198** | |
| 3 | नाशिक | होलदार नगर | -- | 13 | 9.19 | 6162100 | महसुल विभागाकडुन प्राप्त वनेत्तर क्षेत्र |
| | | | | **एकुण एकंदर** | **27.57** | **25451298** | |

प्रस्तावित पर्यायी वनीकरण क्षेत्रासंबंधीचे आवश्यक असलेले KML फाईल, 7/12 उतारे, नकाशे, 10 वर्षाची पर्यायी वनीकरण योजना इ. कागदपत्र 3 प्रतीत सादर करण्यांत येत आहे. तरी प्रस्ताव मंजुरी विषयी पुढील कार्यवाही आपले स्तरावरुन व्हावी हि विनंती.

महोदय,
मसुदा मान्यतेस
सादर

( नितिन गुदगे )
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नाशिक**

सोबत :- वरीलप्रमाणे

09/03/2023 9/03/2023

**प्रतिलिपी :-** उप वनसंरक्षक पश्चिम भाग नाशिक यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**प्रतिलिपी :-** जिल्हा जल संधारण अधिकारी, मृद धारण विभाग, नाशिक यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.